# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

| अ.क्र. | तपशील | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १ | पीक/वाणाचे नाव | **भेंडी : परभणी भेंडी** |
| २ | प्रसारीत केल्याचे वर्ष | २०१३ |
| ३ | प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |
| ४ | जमीन | हलकी ते भारी जमीन.<br>उत्तम पाण्याचा निचरा असणे आवश्यक आहे. |
| ५ | हवामान | उष्ण हवामान चांगले मानवते २० ते ४०° से. तापमानात वाढ चांगली होते. बियाणे उगवणीसाठी १५° से. पेक्षा जास्त तापमान आवश्यक आहे. |
| ६ | पेरणी/लागवडीचा कालावधी | खरीप : जून—जुलै<br>उन्हाळी : जानेवारी - फेब्रुवारी |
| ७ | प्रती एकर बियाणे | खरीप ८-१० कि. / हे<br>उन्हाळी १०-१२ कि. / हे |
| ८ | पीक व्यवस्थापन | |
| | १ लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन | दोन ओळीतील अंतर ६० सें. मी. व दोन रोपातील अंतर ३० सें. मी. |
| | २ खत व्यवस्थापन | २५ ते ३० टन शेणखत व लागवडीच्या वेळी ५०:५०:५० कि. ग्रॅ. नत्र, स्फुरद व पालाश प्रती हेक्टरी द्यावे व लागवडीनंतर २० दिवसांनी उरलेले ५० कि. ग्रॅ. नत्र प्रती हेक्टरी द्यावे. |
| | ३ पाणी व्यवस्थापन | खरीप हंगामात १० ते १२ दिवसांनी गरजेनुसार व उन्हाळी हगामात ४ ते ५ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे. |
| | ४ कीड व्यवस्थापन | मावा व तुडतुडेसाठी डायमीथोयेट किवा फॉस्फॉमिडान १० मि. ली. १० लीटर पाण्यात मिसळुन ८ ते १० दिवसांनी फवारणी करावे तसेच शेडे फळे पोखरणारी अळी साठी क्लोरोपायरीफॉस / प्रोफेनोफॉस १७ मि.ली. १० लीटर पाण्यात मिसळून फवारावे. किंवा लॅम्बडा सहयालोथ्री ५% प्रवाही ०.०८% च्या चार फवारण्या कराव्यात. |
| | ५ रोग व्यवस्थापन | हळदया (यलो व्हेन मोझॅक) रोगासाठी डायमिथोएट / फॉस्फॉमिडान १० मि.ली. १० लीटर पाण्यात मिसळुन फवारावे. आवश्यकतेनुसार पुढील १५ ते २० दिवसांनी कीटकनाशकांची फवारणी करावी.<br>भुरी रोगासाठी २५ ग्रॅम पाण्यात मिसळणारा गंधक / कॅराथेन ५-१० मिली. प्रती १० लीटर पाण्यातुन आलटुन — पालटुन १०-१५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. |
| ९ | पिकाचा कालावधी | ९५ दिवस |
| १० | उत्पादकता | ९२.३० क्वि. हे. |
| ११ | वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म | १. पावसाळी व उन्हाळी हंगामामध्ये लागवडीसाठी फायदेशीर<br>२. अधिकतम उत्पन्न १२७.३४ क्वि. प्रती हेक्टर<br>३. सरासरी उत्पन्न ९२.३० क्वि. प्रती हेक्टर<br>४. फळे मध्यम हिरव्या रंगाची असून पाच शिरा असलेली.<br>५. फळाची लांबी १२.०० सेंमी |

| | | |
|---|---|---|
| | | ६. पीक कालावधी ९५ दिवस<br>७. ५० टक्के फुलो-यात येण्याचा काळ ४० दिवस<br>८. हा वाण पिवळा विषाणू रोगास व फळे पोखरणा-या अळीस मध्यम प्रतीकारकक्षम |
| **१२** | **वाणासंबंधीचे छायाचित्रे** |   |